नाशिक व त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक येथे सन २०२६-२०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या नियोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
निर्णय क्रमांक: कुंभमे २०२३/प्र.क्र.१८३/नवि-२५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १४ डिसेंबर, २०२३.

प्रस्तावना-

नाशिक व त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे सन २०२६-२०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येत आहे. मोठ्या संख्येने भाविक / पर्यटक अपेक्षित आहेत. कुंभमेळा यशस्वीरित्या पार पडावा याद्दष्टीने मोठया प्रमाणावर दळणवळण, परिवहन, पाणी पुरवठा, राहण्याची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, विद्युत व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था, वाहनतळ व्यवस्था, इत्यादी सुविधा पुरविण्याच्या द्दष्टीने नियोजन व त्याची प्रभावशाली अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, उत्कृष्ट नियोजन व प्रभावशाली अंमलबजावणी यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे विविध समित्या स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

सिंहस्थ कुंभमेळ्याचे उत्कृष्ट नियोजन व प्रभावशाली अंमलबजावणी यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली शिखर समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अ) शिखर समिती :-

१)	मा. मुख्यमंत्री	अध्यक्ष
२)	मा. उपमुख्यमंत्री (गृह)	उपाध्यक्ष
३)	मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)	सदस्य
४)	मा.मंत्री (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण)	सदस्य
५)	मा. मंत्री (उद्योग)	सदस्य
६)	मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री नाशिक	सदस्य
७)	मा. मंत्री (महसूल)	सदस्य
८)	मा. मंत्री (कृषी)	सदस्य
९)	मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य)	सदस्य
१०)	मा. मंत्री (पाणीपुरवठा)	सदस्य
११)	नाशिक जिल्हयातील मा.संसद सदस्य	सदस्य
१२)	नाशिक जिल्ह्यातील सर्व मा.वि. स.स. व नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व मा.वि.प.स.	सदस्य

१३)	महापौर, नाशिक महानगरपालिका	सदस्य
१४)	मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य	सदस्य
१५)	सिंहस्थ संबंधित पुरोहित संघ	सदस्य
१६)	अध्यक्ष, त्र्यंबक नगरपालिका	सदस्य
१७)	अतिरिक्त मुख्य सचिव (गृह)	सदस्य
१८)	प्रधान सचिव (नियोजन विभाग)	सदस्य
१९)	प्रधान सचिव (वित्त विभाग)	सदस्य
२०)	प्रधान सचिव (नगर विकास १)	सदस्य
२१)	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य	सदस्य
२२)	महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे	सदस्य
२३)	विभागीय आयुक्त, नाशिक	सदस्य
२४)	जिल्हाधिकारी,नाशिक	सदस्य
२५)	आयुक्त, नाशिक महानगरपालिका	सदस्य
२६)	दूरसंचार विभागाचे प्रतिनिधी	सदस्य
२७)	प्रधान सचिव (नगर विकास -२)	सदस्य सचिव

ब) शिखर समितीची कार्यकक्षा :-

१) सिंहस्थ कुंभमेळयाच्या नियोजन आराखडयास व खर्चास मंजूरी देणे.
२) सिंहस्थ कुंभमेळयाच्या मंजूर नियोजन आराखडयाच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेणे.
३) सिंहस्थ कुंभमेळयाच्या आयोजनाच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक बाबी.

२. उपरोक्त शिखर समिती व्यतिरिक्त नियोजन आराखडयाची शिफारस करणे, प्रत्यक्ष कामांना मंजूरी देणे, वेळोवेळी कामाचा आढावा घेणे, सर्व विभागांमध्ये कामाच्या बाबतीत समन्वय ठेवणे यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती (High Power Committee) खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे :-

अ) उच्चाधिकार समिती (High Power Committee) :-

१)	मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य	अध्यक्ष
२)	अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग)	सदस्य
३)	अप्पर मुख्य सचिव (आरोग्य विभाग)	सदस्य
४)	मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव	सदस्य
५)	प्रधान सचिव (नगर विकास - १)	सदस्य
६)	प्रधान सचिव (नगर विकास - २)	सदस्य
७)	प्रधान सचिव (नियोजन)	सदस्य
८)	प्रधान सचिव (वित्त)	सदस्य
९)	प्रधान सचिव (पाणीपुरवठा)	सदस्य
१०)	प्रधान सचिव (जलसंपदा)	सदस्य
११)	प्रधान सचिव (उर्जा)	सदस्य
१२)	प्रधान सचिव (परिवहन)	सदस्य

१३)	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य	सदस्य
१४)	सचिव (सार्वजनिक बांधकाम/रस्ते)	सदस्य
१५)	विभागीय आयुक्त, नाशिक	सदस्य
१६)	आयुक्त, नाशिक महानगरपालिका	सदस्य
१७)	जिल्हाधिकारी, नाशिक	सदस्य
१८)	उप सचिव (नगर विकास)	सदस्य सचिव

ब) उच्चाधिकार समितीची (High Power Committee) कार्यकक्षा:-

१) नियोजन आराखडयास शिखर समितीची मान्यता घेण्यासाठी छाननी करुन शिफारस करणे.
२) सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने घ्यावयाच्या कामांच्या प्रस्तावांना मान्यता/सुधारित मान्यता देणे.
३) सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने घ्यावयाच्या कामांचा वेळोवेळी आढावा घेणे.
४) सर्व संबंधित प्रशासकीय विभाग, केंद्र शासनाचे प्रशासकीय विभाग यांच्याशी वेळोवेळी समन्वय साधून कामाच्या प्रगतीमध्ये येणाऱ्या अडी-अडचणी सोडविणे, संबंधितांना मार्गदर्शन करणे.
५) बैठकीसाठी आवश्यकतेनुसार कोणत्याही विभागाच्या अधिका-यास बोलाविण्याचे अधिकार समितीस राहतील.
६) प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण होईल याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे.
७) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे कुंभमेळा कक्ष स्थापन करण्यासाठी आवश्यक त्या पदनिर्मितीच्या प्रस्तावास मान्यता देणे.

३. सन २०२६-२०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या नियोजनासाठी मा. मंत्री (ग्रामविकास व पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे:-

अ) जिल्हास्तरीय समिती :-

१)	मा. मंत्री, (ग्रामविकास व पर्यटन)	अध्यक्ष
२)	मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री नाशिक	सह-अध्यक्ष
३)	नाशिक जिल्हयातील मा.संसद सदस्य,	सदस्य
४)	नाशिक जिल्हयातील सर्व मा. विधानसभा सदस्य व नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व मा.वि.प.स.	सदस्य
५)	विभागीय आयुक्त, नाशिक	सदस्य
६)	विभागीय आयुक्त, पुणे	सदस्य
७)	आयुक्त, नाशिक महानगरपालिका	सदस्य
८)	जिल्हाधिकारी, पुणे	सदस्य
९)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक	सदस्य
१०)	पोलीस आयुक्त, नाशिक	सदस्य
११)	पोलीस अधीक्षक, नाशिक	सदस्य
१२)	जिल्हा प्रबंधक, दूरध्वनी विभाग, नाशिक	सदस्य

१३)	मध्य रेल्वेचे प्रतिनिधी	सदस्य
१४)	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी	सदस्य
१५)	विभागीय व्यवस्थापक, एस.टी. महामंडळ	सदस्य
१६)	मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपालिका	सदस्य
१७)	जिल्हाधिकारी, नाशिक	सदस्य सचिव

ब) जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा:-

१) सदर समितीने कुंभमेळयाचे नियोजन सुरळीत पार पाडण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
२) सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने घ्यावयाची कामे विहित कालावधीत पूर्ण होतील याकरिता आवश्यकतेनुसार आढावा घेणे.

४. कुंभमेळयाच्या सर्व बाबींचे योग्य रितीने नियोजन करुन व प्रभावशाली अंमलबजावणी करुन कुंभमेळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांना प्रमुख समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. तसेच त्यांना दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय कार्यकारी समिती गठीत करण्यात येत आहे:-

(अ) जिल्हास्तरीय कार्यकारी समिती :

१)	जिल्हाधिकारी, नाशिक	अध्यक्ष
२)	आयुक्त, महानगरपालिका, नाशिक	सदस्य
३)	पोलीस आयुक्त, नाशिक	सदस्य
४)	पोलीस अधिक्षक, नाशिक	सदस्य
५)	अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक	सदस्य
६)	अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, नाशिक	सदस्य
७)	अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक	सदस्य
८)	अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी	सदस्य
९)	उप संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, नाशिक	सदस्य
१०)	प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक	सदस्य
११)	विभागीय व्यवस्थापक, एस.टी. महामंडळ, नाशिक	सदस्य
१२)	मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपालिका	सदस्य
१३)	निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक	सदस्य सचिव
१४)	गरजेनुसार इतर सदस्य	--

(ब) समितीची कार्यकक्षा-:

१) कुंभमेळा यशस्वीरितीने पार पाडण्यासाठी नियोजन आराखडा तयार करणे.
२) मंजूर नियोजन आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी सर्व कार्यान्वित यंत्रणांशी समन्वय साधणे.
३) कुंभमेळयाच्या अनुषंगाने कामांचा वेळोवेळी आढावा घेणे.
४) जिल्हास्तरीय सर्व कार्यालयांच्या यंत्रणाशी समन्वय साधणे.
५) प्रकल्पांची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करणे.
६) सदर समितीला आवश्यकतेनुसार कार्यानुरूप विविध समित्या गठीत करणे.

७) कामाच्या निमित्ताने कोणत्याही अधिका-यास बोलविण्याचे व त्यांना योग्य त्या सूचना करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, नाशिक यांना राहतील. जिल्हाधिकारी, नाशिक हे प्रमुख समन्वय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कुंभमेळा व्यवस्थापनासाठी विशेष कक्ष उभारतील व त्यासाठी लागणारा अधिकारी/ कर्मचारीवृंदाचा प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीपुढे मान्यतेसाठी सादर करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०११०१७३९३०८५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHANKAR TRYAMBAK JADHAV

Digitally signed by SHANKAR TRYAMBAK JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=65f3f4695111ee4b72455e21ef9099788d9b999ffbcaaa070711f14d2a10e138, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C83EBBB277C2E72C85231B87F684C424A13C398A4F921B6D167A8C859E9817F5, cn=SHANKAR TRYAMBAK JADHAV
Date: 2024.01.10 17:38:25 +05'30'

(शं. त्र्यं. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५) मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
७) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री नाशिक यांचे खाजगी सचिव
८) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
९) मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव
१०) मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
११) मा.मंत्री (पाणीपुरवठा) यांचे खाजगी सचिव
१२) नाशिक जिल्ह्यतील मा.संसद सदस्य
१३) नाशिक जिल्हयातील सर्व मा.वि.स.स.व नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व मा.वि.प.स.
१४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य
१५) अतिरिक्त मुख्य सचिव (गृह)
१६) प्रधान सचिव (नियोजन विभाग)
१७) प्रधान सचिव (वित्त विभाग)
१८) प्रधान सचिव (नगर विकास -१)
१९) प्रधान सचिव (नगर विकास - २)
२०) विभागीय आयुक्त, नाशिक
२१) विभागीय आयुक्त, पुणे
२२) जिल्हाधिकारी, नाशिक
२३) जिल्हाधिकारी, पुणे
२४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक
२५) पोलीस आयुक्त, नाशिक
२६) आयुक्त, नाशिक महानगरपालिका

२७) जिल्हा प्रबंधक, दूरध्वनी विभाग, नाशिक
२८) मध्य रेल्वेचे प्रतिनिधी (नाशिक)
२९) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी
३०) विभागीय व्यवस्थापक, एस. टी. महामंडळ
३१) मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपालिका
३२) सर्व मंत्रालयीन विभाग
३३) निवड नस्ती (नवि-२५)